World Wide Journal of Multidisciplinary Research and Development

WWJMRD 2017; 3(2): 107-108
www.wwjmrd.com
E-ISSN: 2454-6615

**विश्वास गोरखनाथ वळवी**
(संशोधक विद्यार्थी)
कबचौ उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ
जळगाव (महाराष्ट्र)

# ''ब्रदर डेनिएल:-भारतात आध्यात्मिक संजीवनाची सुरुवात करणारा भारतीय प्रेषित''

**विश्वास गोरखनाथ वळवी**

**Abstract**
Brother Daniel Lemons is the founder of the Evangelical Fellowship. He led a spiritual revolution in Madras, Tamil Nadu, Andhra Pradesh and Karnataka from 1935 to 1963. As a result, millions of people accepted Christ in India. This happened in 1897. In 1914, while attending a missionary school, he was converted by a hermit. Now Masulipatnam has become the center of his evangelism, and in his early days he won many s Paul Dhansingh says, "Brother Daniel was renowned as one of the great founders of the Christian Church of the twentieth century. He was a pioneer in the spiritual revival movement and a leader of the twentieth century. He freed countless people from the bondage of sin. from immorality, from crime, from drunkenness, from poverty and destruction, and brought them to a victorious life in the Lord Jesus. Millions today attribute their spiritual life to them."ouls for the Lord.

**Keywords:** God, Prayer, Christ, Daniel, Sins, Forgiveness, Christian, Movement, Brother, Christian Church

**प्रस्तावना:**
ब्रदर डेनिएल हे लेमंस इव्हानजीकल फेलोशीप या मंडळीचे संस्थापक असून १९३५ ते १९६३ या काळात त्यांनी भारतात मद्रास,तामिडनाडू,आंध्रप्रदेश,कर्नाटक,या राज्यात आध्यात्मिक क्रांती आणून सोडली त्याच्या परिणाम भारतात लाखो लोकांनी ख्रिस्ताच्या स्वीकार केला.ब्रदर डेनिएल यांच्या जन्म आंध्रप्रदेशातील अमालापूर या गावी ७ मार्च १८९७ रोजी झाला.१९१४ मध्ये मिशनरी शाळेत शिकत असतांना एका उपदेशातून त्यांचे परिवर्तन झाले.आता मासुलीपटनम हे त्याचे सुवार्तेचे केंद्र बनले होते,आणि आपल्या सुरुवातीच्या काळात प्रभूसाठी अनेक आत्मे त्यांनी जिंकले.१९४२ नंतर खऱ्या अर्थाने त्याच्या उपदेशाने भारतात संजीवानाची नवीन लाट आली.

भारतातील मिशनरी चळवळीत महान संजीवणाची लाट आणणारे ब्रदर डेनिएल यांनी भारतातील लाखो लोकांना ख्रिस्तात आणले.आपल्या तरुणकाळात रोज निर्जन स्थळी जाऊन ते दोन-तीन प्रार्थना करत असे आणि देवाच्या पवित्र वचनाचे मनन करीत असे.काही वेळेस पाऊस पडत असतांना देखील ते डोंगरावर जाऊन देवाची स्तुती करीत असे.ब्रदर डेनिएल म्हणतात "अशाच प्रकारे एकदा मी जात असताना देव मला म्हणाला,तुझा मार्ग बदल,पण मी मात्र नेहेमीप्रमाणे गेलो.पुढे माझ्या गळ्यापर्यंतच्या पाण्यात मी बुडालो.मी देवाला म्हटले,देवा हे काय आहे?देव म्हणाला तू तुझ्याच मार्गाने गेलास,म्हणून असे झाले पाऊस असो वा नसो रोज रात्री मी नित्यनियमाने प्रार्थनेस बाहेर जाई,पण न घाबरताना देव माझ्यासंगती आहे हे जाणून प्रार्थनेत राहिलो.वसतिगृहात परत जाण्याची इच्छा होत नसे.अशावेळी देव मला आज्ञा देई की,तुझ्या खोलीवर माघारी जा आणि अभ्यास कर,माझ्या कल्पना व विचार प्रार्थनेच्या सवयीमुळे शुद्ध राहिले.त्यामुळे मला नवीन जीवन नवीन सामर्थ्य प्राप्त झाले." ब्रदर डेनिएल यांनी मिशनरी चळवळीत संजीवन कसे घडवून आणले तर उत्तर असेन प्रार्थना,त्यांनी आपले संपूर्ण आयुष्य घुडघे टेकून प्रार्थनेत घालविले,भारतातील लोकांसाठी अश्रू गाळत त्यांनी ख्रिस्ताचा संदेश दिला. ब्रदर डेनिएलचे मिशनरी चळवळीतील प्रत्येक कार्याची सुरुवात ही प्रार्थनेने होत असे म्हणून त्यांच्याशी देव नेहेमी सहमत होते.ब्रदर डेनिएल यांचे कार्य भारतातील मिशनरी चळवळीला गती देणारे ठरले.

पौल धनसिंग म्हणतात "विसाव्या शतकातील ख्रिस्ती मंडव्याचे निर्माण करणारे एक महान संस्थापक म्हणून ब्रदर डेनिएल प्रसिद्ध होते.आध्यात्मिक पुनरुज्जीवनाच्या चळवळीत प्रामुख्याने ते अग्रग्रामी होते व विसाव्या शतकातील पुढारी होते. परंतु इतर महान संदेशाप्रमाणे त्यांच्या मंडळीच्या बाहेर इतरांना ते

**Correspondence**:
**विश्वास गोरखनाथ वळवी**
(संशोधक विद्यार्थी)
कबचौ उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ
जळगाव (महाराष्ट्र)

इतके परिचित नव्हते.संपूर्ण राष्ट्रात त्यांचे कार्य वाढत्या प्रमाणात चालू होते.पापाच्या बंधनातून,दु रचरणातून, गुन्हातून, दारुबाजीतून,दारिद्यतुन व नाशाच्या मार्गातून त्यांनी असंख्य लोकांना मुक्त केले व प्रभू येशूमधील विजयी जीवनात आणले.आज लाखो त्यांच्या आध्यत्मिक जीवनाचे श्रेय त्यांना देतात."

ब्रदर डेनिएल यांनी लेमन्स इव्हजिलीकल फेलोशिप या संस्थेची स्थापना केली.आणि ख्रिस्तात सुवार्तेची घोषणा केली.ते म्हणत १) ज्यांच्याविरुद्ध आम्ही काही अपराध केले असतील तर त्याचे प्रायश्चित म्हणून आपण आपले संपूर्ण आयुष्य मिशनरी चळवळीसाठी समर्पित करून द्यावे.२) ज्या लोकांना तुम्ही दुःख दिले असणार त्यांच्याशी समेट घडवून आणणे हे एका ख्रिस्ती व्यक्तीचे कर्त्यव्य आहे.३) देवाने मिशनरी चळवळीत प्रत्येक ख्रिस्ती व्यक्तीसाठी एक योजना तयार केलेली आहे,त्या योजनेला आपण प्रतिसाद दिला पाहिजे तरच ख्रिस्त त्या योजनेत आपली वाढ करून देवाचे गौरव करून घेईल.४) देवाला विश्वासाने सामोरे जा जोपर्यंत पापाच्या क्षमची खात्री होत नाही तो पर्यंत प्रार्थना करत रहा.५) आदामाचा स्वभाव आपल्या पूर्वजांकडून आपल्यात असतो त्यामुळे पश्चाताप करतांना पूर्वजांच्या पापांचा देखील उल्लेख करून क्षमा प्राप्त करू घ्या.६) जे देवाचे ते देवाला ध्या आणि ज्या सरकारचा राज्यात आपण वस्ती करितात तेथील कर देखील प्रामाणिकपणे भरून एक सत्य मिशनरी म्हणून स्वतः उभे रहा.

**संदर्भसुची:-**


1. ख्रिस्ती मिशनरींचे योगदान,पारखे कामिल,सुगावा प्रकाशन,२००३,पुणे.
2. महाराष्ट्रातील ख्रिस्ती मिशन्सचा इतिहास,रेव्ह.बी.सी.भोसले.इम्मनुएल प्रकाशन,पुणे
3. Brother Deniel,Iternal Light Tracts.septembar 2014,Nashik .